GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# जत्रा

**बालाजी ग्यानोबा कांबळे**

(सहायक प्राध्यापक)
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल)
मुंबई विद्यापीठ,मुंबई

डिसेंबरचा महिना होता , थंडीन साऱ्याच्या अंगात कुडकुडी भरलेली होती. पाच -सहा ला उठायची कुणाचीही मजाल .. (हिंमत ) नव्हती .. पाणी ही बर्फ होत असत, अश्या थंडीत माय सकाळी पाच वाजता उठायची आणी सकाळी सकाळी शेताला जाऊन , हरबऱ्याची भाजी खुडून आणायची आणी लोक उठण्याच्या अगोदर आमच्या घरी हरबऱ्याची भाजी चुलीवर शिजयला पडायची ,सारे आम्हच्या, चुलीवरील भाजीकडे बघून ..नवल करत असत, तेवढ्यात पारू मावशी आली आणी म्हणाली ,कोण्या येळाला गेलीस ये .. माय .. जना म्हणून दरवाज्या समोर उभा राहिली .. माय म्हणाली जाव लागते बाई, काय कराव........ सकाळची न्याहारी पुरती आणली। आत्ता खंडोबाची जत्रा जवळ आली , भाजीच बघून कामाला जाव लागते .. पारूबाई..! म्हणत मायन पारूमावशीला चहा पिण्याचा आग्रह केला , पारूमावशी कोणताच विचार न करता ..कर ..बाई चहा , म्हणून बसली , पोर घरीच आहेत .. वाटत..! म्हणत पारूमावशी घरात येऊन बसली . मायन चुलीवर चहा ठेवला.. आम्ही ही उठलो, इकडच्या तिकडच्या दोघीच्या गोष्टी झाल्या .. चुलीवरला चहा मायन कपात भरला पारूमावशीला दिला. आम्हालाही थोड थोड .. दिला . चहा घेत पारूमावशी मध्येच बोलली .. खंडोबाची जत्रा आली .. जवळ, आमच ही नवस हाय माय..! पोराच्या बापान बोलला होता. आत्ता चांगल झालं आहे एक पिलु घेऊन “डोक्यावरल..! ओझ उतरायच हाय” ..माझ तेच्यातच दिवस कधी जातो कळत नाही ..सकाळपासून चहा घेतला नाही , म्हणून हसत चहाचा कप घेतला , माय, म्हणाली.. या जत्रला हाय का ? तुमचं नवस ..? ह.. य ss. माय हाय काल... शनवारच्या बाजाराला गेल्यात बकर आणायला ..? आत्ता घरातल सारवण सुरवन हाय .. माझ्या माग तुला ह्या पोरी कामात मदत करतात , मला काय माय देवाण पोरगी दिल नाही ,सार काम मलाच कारव लागते पोराची जात .. खातात आणी बाहीर फिरतात .. म्हणून मुलगी नसल्याची खंत पारूमावशी मायच्या पुढे व्यक्त केली ......?

मायन विषय बदलला जाऊ द्या बाई ते कोणाच्या हातात हाय .. नशीबाच्या गोष्टी हाईत बाई असं म्हणू लागली..पारुमावशी हू.. हा .. करत बर मग जातो सयपाक.. करायचं हाय .. गड्याला कामावर जायच हाय ..! चल मी येते,.. म्हणून पारुमावशी उठली आणी घराकडे निघाली .. मायन सा
वरासावर केली , अगदी तोंडावर गावची खंडोबाची जत्रा आली होती, जत्रच्या निमित्याने बाईलेकी पण येतात , पाहुण्याची वर्दळ असते त्यासाठी लाकुडफाटा ,घरात खायला धान्य , डाळ -दुळ ,असायला पाहिजे म्हणून मायन जीवाचा आटा पिटा करून घरात जमवल होत , आत्ता फक्त जत्रची वाट पहात होती , सारे पाहुणे सांगावा धाडत होते , की, आम्ही तुमच्या गावच्या जत्रला येणार म्हणून .. मायन सर्व व्यवस्था करून ठेवली होती ..
आमच्या गावातील हावशी पहिलवान मंडळी .. जोर काडत होते ..... दंड उठक बशी , कुस्त्याची तालीम करीत होते , गावात आपण हरणे म्हणजे आपली नामुसकी होईल या .. भीतीने प्रत्येक पहिलवान , सकाळच्या चार पासून सराव करू लागले होते , त्याची दंडावरील थापेचा आवाज पाहून बाबा ही म्हणत असत, काही हो गड्या.., ह्या बहादूरीच्या खेळात आपल ही पोरग असायला पाहिजे असं म्हणू लागला , सगळ कसं आनंदात वातावरण झाल होत, आमच्या शेजारील भावकीतील काही मंडळी कुस्ती खेळण्यासाठी आतुर होते , आम्ही पण आपला भाऊ जातो म्हणून कुस्त्याच्या ताळमीत जाऊ लागलो ,,, मध्ये मध्ये .. कुस्त्याचा सराव ही करू लागलो .. कुस्त्याचा सराव करून आल की, माय आमच्याकडे पाहायची आणी तोंड लहान करून म्हणायची .... बापू , कुस्ती खेळायला .. खायला पाहिजे र .... अंगात मस्ती पाहिजे कुठ वरण भात आंबिल पिऊन कुस्त्या खेळतात काय ..? माझा छोटा भाऊ तानाजी कुस्त्यात नंबर वन होता. त्याला कुस्ती पण फार आवडायची घरात खायला काही असो की ,, नसो तो मात्र रोज सराव करायला जायांचा , आणी संध्याकाळी तोंड पांढर करून यायचा .. नाही मला आपल्या गावाच्या जत्रात कुस्ती खेळणारच हा त्यानी चंग

https://www.gapbhasha.org/

बांधला होता , मायन त्याच्या जिद्दीला सलाम केला, आणी लेकराच्या अंगात ताकत असावी म्हणून . सावरमाळ्यांच्या चंद्रबाई च्या घरी गाईच एक लीटर दूध पिण्यासाठी आणायची , तेव्हा माझ्या भावाच्या अंगात इतर पैलवानांसारखी ताकत आली ..मायन माझ्या भावा बरोबर मला ही दूध पिण्याच आग्रह करत असत मी मात्र दूध पिऊन व्यायाम करू लागलो आमच्या मांग -महार मंडळीतील सारी मुले एकत्र राहून कुस्त्याचा सराव करू लागलो , आमच्यावर गावातील पोर .. जळू लागली होती .. ही लोक कुस्त्याच्या नादात पडले तर आपणाला नक्कीच हारवतील असं ही जुन्या
पहिलवान मंडळीला वाटू लागल होत, पण तो एक काळ होता , की आपल्या गावात आपण काही तरी नावीन्य करून दाखवल पाहिजे असं प्रत्येक तरुणाला वाटू लागल होत .

आमच्या आजू बाजूच्या गावातील कुस्त्या होऊ लागल्या , गावातील पैलवान कुस्त्या खेळून येऊ लागले आणी गावात त्यांची चर्चा होयायच्या , मला ही वाटायचं आपणही जर अशी यांच्या सारखी कुस्ती खेळलो तर गावात आपलंही नाव होईल म्हणून त्याच्या चर्चा मन लाऊन ऐकू लागलो .. आमच्या गावातील मातभर... ( भरपूर ) पहिलवान होते गावातील प्रत्येक घरचा पैलवान होता .. पण मांगा - महारच्यात एकही पैलवान नव्हता कारण कोणाच्याही घरात तीन टाइम ही जेवण मिळायच नाही , ही मोठी खंत आमच्या समाजाची होती , पण अश्याही परिस्थितीतून आमंच्या वार्डातील काही जवान मंडळी कुस्ती खेळण्याचा प्रयत्न करीत असत .. पण त्याना यश आल नाही पण नित्य नियमाने आम्ही व्यायामला जाण्याची सवय लागली होती . सारी गावतली पोर जोमान कुस्त्याचा फडात जाऊन तयारी करू लागले , आमच्या गावातील पन्नास च्या वर “एक से बडकर एक पैलवान” तयार झाले होते , आमच्या आंबुलगा या गावच नाव घेताच एक वेगळ आदर्श निर्माण झाल होत , आमच्या गावातील सारी मंडळी एकत्रच काम करत होते , कोणताही भेद भाव नव्हता ..जाती पातीच राजकारण नव्हत .. आज ही नाही . सारी मंडळी एक मनाने वागत होते , आमच्या गावातील कैकाड्याचा गंगाराम पैलवान प्रसिध्द होता , त्याच्या मार्गदर्शना खाली गावातील पाटील पांडे , इतर समाजातील लोक त्यांना गुरु मानू लागले होते. त्याची शिकवण सर्वांना समावून घेण्याची विचार शक्ती त्यांच्यात होती , आणी आम्हच्या गावातील सर्व जातीतील लोक , एक मेकांस समजून घेऊन चालतात ही आमच्या गावाच वैशिष्टे आहे , पैलवान गंगाराम हा जरी जातीन कैकाडी समाजाचा असला तरी त्यांना सर्व गावातील पैलवान मंडळी गुरु म्हणून मानत असत .. खाटकाचा . सलीम , मोईन . रसूल , ही मुसलमान मंडळी आमच्या गावात आहेत , त्यांच्या अंगात हत्तीच बळ असून ही , साऱ्या गावाशी त्याचा संबंध, चांगला होता मराठी समाजातील मंडळीतील , माली पाटलांचा संजू पैलवान , हिराबाई चा बालाजी , रतनबाई चा खत्री बालू पाटील , वरट्याचा हुल्या , प्रभाकर , कैकाडी राजू , सावर माळ्याचा बापू , मांजरम्याचा हानमू ,अशी गावातील विविध जातीतील मातभर पैलवान मंडळी एखाद्या गावाला कुस्त्याच्या फडात गेल्यास सारे आजू बाजूच्या खेड्यातील लोक त्यांच्याकडे दचकून पाहत असत . अश्या वातावरणात आमच्या गावातील मुलांवर चांगला संस्कार होत होता .. परंतु कुस्त्याच्या फडा बरोबरच तमाशा चा फड ही आमच्या गावात लागायचा , आमची मांगा महारची मंडळी कुस्त्याच्या फडा पेक्षा लावणीच्या फडात ज्यास्त रमत होती . मुळातच ही मांग आणी महार वाड्यातील लोकांच्या घरात कला होती , पारंपारीक कला जपणारी मंडळी होती , आमच्या वाड्यातील संभा मास्तर होता, तो लावणीच्या फडात गावो गावी फिरत असत .. आमची गावातील पैलवान मंडळी जिथे ही कुस्त्यासाठी जात , असत त्या ठिकाणीच लावणीच्या फडात जात असत ..! त्यामुळे त्याना ही लावणीचा थोड्या फार प्रमाणात नाद लागला .. काही पैलवान मंडळी त्यातून सुधारले .. पण काही पैलवान मंडळी त्यातून वाया....ही गेल्याचे दिसून आले ..त्यामध्ये रतन बाईचा खत्री बालू ,आणी हिराबाई चा बालाजी पाटील यांचा कुस्तीचा नाद संपुष्टात आला .

कैकाड्याच्या गंगाराम पैलवाणाच्या घरात अजूनही कुस्तीचा वारसा त्यांची मूल चालवतात , त्यामध्ये राजू आणी मारती ही दोन भावंडे आजही गावच नाव चार खेड्यात गाजवतात , आणी आपला कुस्त्याचा फड कायम ठेवले आहेत , परंतु काही गावातील मंडळी आपापल्या संसारात गुंतून गेल्याचे दिसून येते तर काही पैलवान मंडळी लावणीच्या फडाच्या या वाईट नादामुळे आपले कामावलेले शरीर गमावून बसले आहेत , परंतु आमच्या समाजातील मंडळी मात्र जेवढ्या पुरते तेवढे ,,, लावणीचा नाद करतात पण त्यांच काही ही गेल नाही , परंतु त्यातून त्याना रोजगार मात्र नक्की मिळाला असे ही म्हणता येईल , नुकसान होण्यासाठी यांच्याकडे काहीच नव्हत .. जेव्हा गावात तमाशगीर यायचे तेव्हा आमचीच मंडळी त्याना आसरा देयायचे .. कारण तमाशा करणारी मंडळी आमच्याच जातीतील असायचे म्हणून आम्हाला ही त्यांच्या बद्दल आपुलकी, वाटायची .. ती मंडळी ही आमच्या मांग- महार वाड्यात

https://www.gapbhasha.org/

आवर्जून यायचे ।। आमच्या गावाची खंडोबाची यात्रा म्हणजे चार खेड्यात प्रसिध्द होती , आमच्या गावातील प्रतिष्ठीत नागरीक मा . श्रीवंत पाटील याच्याकडे यात्रेचा मान होता . आज ही आहे., त्याच्या घरून खंडोबाची पालखी निघायची परत त्याच्या घरी ठेवली जायची .. खंडोबाची यात्रा जवळ आली होती सारे लोक आप आपल्या कामाला लागली होती , धावपळ करून घरात सारी गरीब मंडळी धान्य जमवलेली होती, आमच्या गावाच्या शेजारी असलेल्या राजुरा , (बू) या गावाची यात्रा आली , मी आणी माझा भाऊ जत्रला जाण्याचे स्वप्न पाहू लागलो .. उद्याच्या राजुर या गावाच्या यात्रेला जाण ही गरजेच वाटू लागल होत .. आम्ही जीवांचा आकांत करून कापूस वेचून पैसे जमावलेले होतो .आणी राजुऱ्याच्या यात्रेला जाण्याचा बेत करून होते आमच्या गावातील पैलवान मंडळीचा तलामीचा डाव जोरदार चालला होता . राजुरा गावात तमाशाचा ही फड येणार होता . या विचाराने आम्ही राजुऱ्याच्या जत्रेची वाट पाहू लागलो , मायन ही राजुरच्या यात्रेला जाण्याची परवानगी दिली होती , आम्हाला आता राजुरला जायाला मिळते म्हणून आम्ही खुश होतो , एकदाची राजुऱ्याची यात्रा आली सकाळी लवकर उठलो आंघोळ करून घेतलो आणी राजुरला कुस्त्याचा डाव पहाण्यासाठी निघालो .. मायन देवावर भंडार उडवण्यासाठी दोन रुपय दिली ,,, मी आणी माझा भाऊ यात्रेला निघालो मायला माहीत नाही ते ही आम्ही गावाच्या पाटलाच्या खारीतून काही कापूस वेचून ठेवलो होतो , त्याचे ही पाच रुपये आम्हच्या जवळ जमले होते , एकूण आमच्या जवळ आठ रुपये झाले होते , यानी आम्ही राजुरच्या यात्रेला निघालो ,राजुऱ्याच्या जवळ गेलो त्या ठिकाणी आगाशी (आकाशी ) .. पाळणे आलेले होते , सर्वत्र पाली ठोकलेली होती , रंगी बेरंगी फुगे हातात घेऊन मूल फिरत होते , आगाशी पाळण्याचा आवाज , पोरांच्या बासरीचा आवाज , पुंग्याचा आवाज, या मुळे सर्वत्र गर्दी झाली होती कोणाच कोणाला काहीही ऐकायला येत नव्हत ,खंडोबाच्या यात्रेची पालकी निघाली होती , आमच्या शेजारील रामा त्या पालखीच्या खालून जाण्यासाठी धडपडत होता , म्या .. त्यांच्याकडे पाहून म्हणालो कुठ चलास..? मामा ..तो म्हणाला आर..! वर्षाला एकदा ही पालखी येत असते , त्याच्या खालून आपण गेल की, आपल्या मागील संकटे दूर जातात , पुढच्या वर्षा पर्यन्त आपल्या जीवनात काहीच अडचणी येत नाही , चल आपण पालखी खालून जाऊ म्हणू लागला .. मला ही बर वाटल .. त्याचा विचार माझ्या डोक्यात आला मी आणी माझा भाऊ त्या पालखी खालून जाण्यासाठी निघालो . काहीही हो परंतु त्या खंडोबाच्या पालखी खालून जयायच .. ! असा चंग बांधला .. आणी गर्दीत जाण्यासाठी निघालो ?

रात्रीला फिरलेली पालखी कुस्त्याच्या दिवशी ही मारुतीच्या मंदिरासमोरून जात असते जे लोक पालखीच्या दिवशी उपस्थित राहू शकत नाहीत ते लोक सकाळच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करीत असतात .. आम्हालाही वाटू लागल की या पालखीच दर्शन घेतल पाहिजे ,,,. म्हणून आम्ही दोघे भावंडे जीवतोडून मनापासून आत मध्ये जाण्याचा प्रयत्न करू लागलो , सकाळी मारुतीच्या मंदिरासमोर खूपच गर्दी झाली होती , कसे बसे आम्ही दोघे भाऊ त्या गर्दीत एकदाच घुसलो आणी पालखीचे खांदेकरी आमच्याकडे पाहून .. “ ही बेरकी गाबर ..! कोणत्या गावाची आहेत . म्हणून आमच्याकडे तिरस्काराने पाहू लागले तो पर्यन्त तर आम्ही एकदाच पालखीच्या खालून निघालो .. खरोखर पण आमच्या दोघा भावंडची त्या गर्दीमुळे ताटा तूट झाली. त्या गर्दीत माझ्या छोट्या भावाला आमच्या शेजारचा रामा भेटला होता .मला आमच्या गावच कोणीच दिसत नव्हत म्या एकटा पडलो नंतर माझी व भावाची भेट झालीच नाही .. माझा भाऊ रामा सोबत एकटाच घरी गेला मी मात्र त्याला शोधण्यात राजुरच्या यात्रेत त्याला शोधू लागलो . चुकल्या सारखं झालं आणी मला शेवट पर्यन्त माझा छोटा भाऊं भेटला नाही. मी तिथेच रात्र भर त्याचा शोध काढण्यात माझा बराच वेळ गेला होता , मग मी रात्रीला तिथेच थांबलो .. रात्रीला सर्वत्र अंधार पडलेला होता . अमोशाची रात्र होती , त्या शांत वातावरणात नाटकाच्या फडातील ढोलकीचा नाद कानावर आला आणी माझे पावले त्या दिशांनी वळू लागले...! आमच्या गावातील काही मंडळी आपली जनावर खुंटयाला बांधून संध्याकाळचे नाटक पाहण्यासाठी आले होते , मी त्याना ओळखून त्यांच्या पाठी लागलो , तेवढ्यात धनगर अशोक म्हणाला ये .. पोरा .. गावात बाप तुझा तुला हुडकून परेशान हाय , तू नाटकाला आलास काय ? असं म्हणताच मी त्याला म्हणालो . काका माझा भाऊ दिसला का ? मी त्याला हुडकीतो .. नाटक बघायला आलो नाही. तो अशोक काका बोलला आर तुझा भाऊ गावात हाय .. मी डोळ्यानं बंघून आलो.. चल ..! आत्ता आमच्या बर आत्ता कुठ एकटा जातोस .. चल नाटक पाहून आपण हे नाटक सुटलं की, जाऊ घरी चल म्हणू लागले ......! मला ही त्यांचा आधार वाटला , हो .. म्हणून मी त्यांच्या सोबत नाटक पहायायला निघालो , आमच्या गावातील बरीच मंडळी दिसू लागली आणी माझ्याकडे पाहून ते हसू लागले बक्कळ नाद हाय ..! ग्यानू च्या पोराला धनगर अशोक म्हणाला नाही हो , चुकून राहिला अंधारच कुठ जाईल पोरंग म्हणून .. माझ्या सोबत घेऊन आलो , याला काय उचलून नेयायच हाय ..! म्हणून

https://www.gapbhasha.org/

अशोक काका चल ..! म्हणून हातात हात घातला आणी आम्ही नाटक पाहण्यासाठी निघालो ..;.. डोंगरे हिराबाई चा नाटकाचा फड आला होता जोर जोरात .. लॉडीसपिकरचा आवाज कानात घुमत होता .. सारे लोक आपल्या मिशीला पीळ मारत फडात येत होते , बाजूला तिकीट घर होते तिथे जाऊन अशोक काका तिकीट घेऊन आला आणी आमच्या गावातील चार जन आम्ही नाटकाच्या पेंडाल मध्ये जाऊन बसलो . लावणी सुरू झाली त्या ढोलकीच्या तालात सारे जाग्यावर डुलू लागले ....... मी त्यांच्याकडे पाहून दंग झालो काय जादू हाय . या ढोलकीच्या थापात मला ही नवल वाटू लागल ..!

रात्र भर नाटक पाहून सकाळ कधी झाली कळालेच नाही. आणी आम्ही सारे .. नाटकाची चर्चच्या करत घरी आलो ..? जवळ पैसा नसताना माझी एकदम मजेत राजुऱ्याची यात्रा झाली .रात्र भर मी घरी नसल्यामुळे माय , आजी . काळजीने प्रत्येकाच्या घरो घरी विचार पुस करत होते. कोणालाच मी भेटलो नाही त्यामुळे सारेच गावात उलट सुलट विचार करू लागले होते. आजू बाजू च्या बायका कुठ .!. गेल .. असल माय पोरग ..! कोणी म्हणू लागल.... , काही खर नाही, कोणाचा भरवसा करायचं आपल्या गावाच्या शेजारी तळ होत आहे कुठ..! त्या तळ्यात घातल की , काय ? गिराजा माय म्हणाली ..! ये बाया व्हा .. काय बी ..!बडबडू नका .. ! असाल लेकरू कुठ तरी त्याला असं काय बी उठ सूट बोलू नका ? झाली त्याची नजर भूल तो येईल .. माय आणी आजी साऱ्या लोकांच्या तोंडाकड पाहून रडू लागली सारा गांव जमा केला ..! सारे चिंतेत होते , कोणालाच माहीत नव्हत की मी राजुरला गेलेल प्रत्येक लोक आपआपल डोक लाऊन तर्क काढू लागले होते. मायन मात्र रड रड रडत होती तेव्हा आजू बाजूचे सारे लोक घरा समोर जमले होते , मी आपल धावत धावत आलो काय झाल काही काळत नव्हत माय आणी आजी रडू लागले होते , माझ्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते ,,, मी समोर येऊन मायला हाक दिला सारे लोक आर आल पोरंग रात्रभर कुठ होतास ..! पोरा म्हणून माय गळ्याला घालून रडू लागली मी म्हणालो, काय झालं ते तरी सांग .. आजी डोळेपुंसत म्हणाली बापू ..! रात्रभर कुठ होतास.. सारी रात्र गेली

आमच्या डोळ्याला डोळा नाही लागला. सकाळ झाली तरी तुझा पत्ता नव्हता जीवाला अवघड करून घेतली .. ? आजीच बोलण संपण्याच्या अगोदर मी म्हणालो, आजी ..! रामु मामा मी भाऊ जत्रेत चुकलो मला भावाला हुडकण्यात एळ झाली होती . गिरजामाय बोलली थत .. एडया पोरा.. रात्रभर मायची काय अवस्था झाली माहीत हाय ..! काय ? .. तू नाटक बघत बसलास.., आपल्या काय ? गावात नाही होय र.. जत्रा .. काय आजच्या जमाण्यातील लेकर बाई.. म्हणू लागली . मला पाहून मायच रड थांबल मी हिरमुसल्यासारखा गप्प बसलो .. सारे मला पाडून बोलू लागले मला शरम वाटली मी मायला म्हणालो माय आज पासून तुला विचारल्याशिवाय कुठेच जात नाही . म्हणून मायची शपथ घेतली आणी सारे लोक आपल्या घरचा रस्ता धरले ,,,,,.?

https://www.gapbhasha.org/